नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे | अंक - १४९ | वार - रविवार दि. २५ ऑक्टोबर २०२६ | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | पाने - ४ | किंमत - ४.०० रुपये | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026
Year - 4rd | Issue - 149 | Blow- Sunday Date 25 OCTOBER 2026 | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | Pages - 4 | Amout - 4 /- Rs | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## राज्यात पुढील आठवड्यात पावसाचे होणार आगमन

### बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र ; हवामानतज्ज्ञ पंजाबराव डख यांनी वर्तवला अंदाज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात यंदा अपेक्षित पाऊस पडलेला नाही. तसेच मान्सूनने महाराष्ट्रातून पाठ फिरवली आहे. त्यामुळे यंदा दुष्काळसदृश्य स्थिती आहे. पण राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देणारी बातमी समोर येत आहे. राज्यात पुढच्या आठवड्यात पाऊस पडणार आहे. बंगालच्या उपसा- गरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले आहे. त्यामुळे आगामी काळात राज्यात पाऊस कमबॅक करणार असल्याची चर्चा आहे. असं असताना हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी याबाबत महत्त्वाचा अंदाज वर्तवला आहे. राज्यात कोण कोणत्या जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता आहे? याबाबत त्यांनी माहिती दिली.

धुकं आल्यानंतर राज्यातून पाऊस निघून जातो. पण तसं चित्र अद्याप दिसलं नाही. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. परतीचा पाऊस येणार आहे आणि रब्बीची पेरणी करुन जाणार आहे. हा परतीचा पाऊस निर्णायक असणार आहे. दररोज वेगवेगळ्या भागात पाऊस पडेल. हा पाऊस शेतकऱ्यांसाठी जीवदान ठरणार आहे, अशी माहिती पंजाबराव डख यांनी दिली.

बंगालची खाडी आणि अरबी समद्र या दोन्ही ठिकाणी तापमानवाढीमुळे बाष्पीभवन होणार आहे. हे बाष्प तयार झाल्यानंतर शेवटचा परतीचा पाऊस येणार आहे. हा पाऊस सोलापूर, सांगली, कोल्हापूर, पुणे, सातारा, अहिल्यानगर, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, हिंगोली, परभणी, यवतमाळ, वाशिम या जिल्ह्यांमध्ये पावसाला सुरुवात होईल. हा पाऊस पुढे सरकत जळगाव, धुळे, नंदुरबारपर्यंत जाईल. त्याचबरोबर अकोला, अमरावती पर्यंत जाईल, असं पंजाबराव डख म्हणाले. येणारा पाऊस हा तेलंगणा आणि कर्नाटकाकडून येणार आहे. त्यामुळे नांदेड, यवतमाळ, चंद्रपूर, लातूर, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यांमध्ये आधी पाऊस सुरु होईल. त्यानंतर परभणी, बीड, अहिल्यानगर, पुणे या ठिकाणी पाऊस पडेल. त्यानंतर पाऊस पुढे सरकेल आणि जळगाव, धुळे, नंदुरबारपर्यंत जाईल. यानंतर अकोला, अमरावती, बुलढाणा, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर या जिल्ह्यांनादेखील पाऊस व्यापून टाकेल, असा अंदाज पंजाबराव डख यांनी वर्तवला.



**राज्यातील चार जिल्ह्यांना उष्णतेचा यलो अलर्ट**

हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, राज्यात काही जिल्ह्यांमध्ये कडाक्याचे ऊन पडणार आहे. पालघर, ठाणे, मुंबई, रायगड या जिल्ह्यांना उष्णतेचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या जिल्ह्यांमध्ये उष्ण आणि दमट वातावरण राहण्याची शक्यता आहे. तर इतर ठिकाणी वातावरण कोरडे राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, नाशिक जिल्ह्यात शनिवारी दुपारी मध्यम स्वरुपाच्या पावसा- ची नोंद झाली आहे.

## आरोप-प्रत्यारोप नको, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीला जा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: एकमेकांवर सुरू असलेले आर- ोप- प्रत्यारोप थांबवा आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीला जा, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या मंत्री, आमदार आणि कार्यकर्त्यांना दिले आहेत. जरांगे पाटील यांनी व्हायरल केलेल्या ऑडिओ क्लिपनंतर शिवसेना आणि भाजप नेत्यांकडून एकमेकांवर आर- ोप प्रत्यारोपाच्या फैरी झाडल्या जात आ- हेत. आता ही कटुता दुर करून दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी पुढाकार घेण्याचे आदेश उपमुख्यमंत्र्यांनी सर्वांना दिले आहेत.




**उपमुख्यमंत्री शिंदे यांचे शिवसेनेच्या सर्व आमदार-मंत्र्यांना आदेश**

राज्यातील दुष्काळाची परिस्थिती अत्यंत गंभीर असून अशा कठीण काळात शेतकऱ्याला आधार देणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे. दसऱ्याच्या मुहूर्तावर शिवसेनेकडून दुष्काळग्रस्त भागांसाठी साडेतीन लाख धान्याची किट पाठवण्यात आली होती. ही मदत त्या त्या भागात पोहोचली असून ती थेट गरजू शेतकरी कुटुंबांपर्यंत पोहचवणे हे शिवसैनिकांचे कर्तव्य असल्याचे आवाहन उपमुख्यमंत्र्यांनी कार्यकर्त्यांना केले आहे. याशिवाय, राज्य सरकारकडून जाहीर होणारी मदत प्रत्यक्षात प्रत्येक गरजू शेतकऱ्यापर्यंत पोहोचते की नाही, याची कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष पाहणी करावी असेही शिंदे यांनी सांगितले आहे.

शासकीय मदतीसाठी लागणारे अर्ज भरण्यापासून ते पंचनाम्यांच्या प्रक्रियेपर्यंत सर्व प्रशासकीय कामांत शिवसैनिकांनी शेतकऱ्यांना मदत करावी असे आवाहन शिंदे यांनी पक्ष पदाधिकाऱ्यांना केले आहे. आपल्या दसरा मेळाव्यातील भाषणात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यंदाची बळीर- ाजाची दिवाळी अंधारात जाऊ देणार नाही, असा शब्द राज्यातील जनतेला दिला होता. हा शब्द पाळण्यासाठी सर्वांनी एकदिलाने काम करावे असे आवाहन शिंदे यांनी शिवसेनेचे सर्व मंत्री, आमदार आणि कार्यकर्त्यांना केले आहे.

## मायक्रो फायनान्सच्या कर्जाचा डोंगर, ३२ वर्षीय तरुण शेतकऱ्याने संपवलं जीवन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



परभणी : राज्यात दुष्काळाचे सावट असताना आणि मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या जुलमी वसुलीविरोधात संताप व्यक्त होत असतानाच परभणीतून एक अत्यंत मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. परभणी जिल्ह्यातील मानवत तालुक्यात एका ३२ वर्षीय तरुण शेतकऱ्याने मायक्रो फायनान्सच्या कर्जाला कंटाळून शेतात गळ्याला दोर लावून आ- पले जीवन संपवले आहे. लहू लाडाने असे मृत शेतकऱ्याचे नाव असून या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

**परभणीतील धक्कादायक घटना**

मिळालेल्या माहितीनुसार, मानवत तालुक्यातील केकरजवळा शिवारात असलेल्या शेतात लिंबाच्या झाडाला लहू लाडाने यांचा मृतदेह लटकलेल्या अवस- थेत आढळून आला. अवघ्या ३२ व्या वर्षी तरुण शेतकऱ्याने अशा प्रकारे टोकाचे पाऊल उचलल्याने लाडाने कुटुंबावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला आहे.

मृत शेतकरी लहू लाडाने यांच्यावर खासगी मायक्रो फायनान्स कंपनीचे मोठे कर्ज असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. शेतीतील नापिकी आणि त्यातच मायक्रो फायनान्सच्या कर्जाचा वाढता डोंगर तसेच वसुलीचा तगादा, या मानसिक ताणतणावातूनच त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. याप्रकरणी मानवत पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

घटनेची माहिती मिळताच मानवत पोलीस ठाण्याच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेऊन घटनेचा पंचनामा केला. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी स्थानिक शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत असून मायक्रो फायनान्स कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून छळवणूक झाली होती का, याचाही शोध घेतला जात आहे. तरुण शेतकऱ्याने जीवन संपवल्यामुळे केकरजवळा गावावर आणि संपूर्ण मानवत तालुक्यावर शोककळा पसरली आहे.

## मुंबईत एटीएसची कारवाई; जैश-ए-मोहम्मदशी कथित संबंध असल्याच्या आरोपावरून तरुणाला अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबईतील माहिम परिसरात दहशतवादविरोधी पथकाने कारवाई करत ३३ वर्षीय मोहम्मद हसन अबू सरमद अख्तर याला अटक केल्याचे वृत्त समोर आले आहे. जैश-ए-म ोहम्मद या दहशतवादी संघटनेशी कथित संबंध असल्याच्या संशयावरून ही कारवाई करण्यात आल्याची माहिती आहे. आरोपीच्या मोबाईलमधील सोशल मीडिया पोस्ट, संदेश आणि ऑडिओ क्लिपच्या आधारे तपास सुरू असल्याचे सांगितले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ढड च्या काळाचौकी युनिटने माहिम म ेट्रो स्टेशनजवळील लक्ष्मी बिल्डिंग परिसरातून आरोपीला ताब्यात घेतले. आरोपी इत्र आणि अत्तर विक्रीचा व्यवसाय करत असल्याचे, तसेच तो बाईक रायडर असल्याचे वृत्त आहे.

तपास यंत्रणांच्या दाव्यानुसार, आरोपीच्या मोबाईलमध्ये प्रक्षोभक मजकूर असलेल्या पोस्ट आणि जिहादचे समर्थन करणारे संदेश आढळले आहेत. जैश-ए-मोहम्मदचा प्रमुख मसूद अजहर याच्या भाषणांच्या ऑडिओ क्लिपही म ोबाईलमध्ये सापडल्याचे सांगितले जात आहे. या डिजिटल सामग्रीचा नेमका संदर्भ आणि आरोपीची भूमिका यांचा तपास सुरू आहे.




आरोपी सोशल मीडियाच्या माध्यम ातून प्रक्षोभक विचारांचा प्रसार करत होता का, याची तपास यंत्रणा चौकशी करत आहे. तो टेलिग्राम ग्रुप चालवत होता आणि त्यावर कथितरीत्या मसूद अजहरच्या भाषणांचे ऑडिओ शेअर करण्यात आले होते, अशी माहिती समोर आली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मुंबई दौऱ्यादरम्यान सुरक्षेशी संबंधित बातमीवर आरोपीने आक्षेपार्ह टिप्पणी केल्याचाही आरोप आहे. तसेच, पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणांशी त्याचा काही संपर्क होता का, याचीही चौकशी केली जात असल्याचे वृत्त आहे. मात्र, या आरोपांची स्वतंत्र अधिकृत पुष्टी होणे आवश्यक आहे. उप- लब्ध माहितीनुसार, आरोपीविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम १९६(१) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. या प्रकरणात इतर संशयित संपर्क आणि ऑनलाइन हालचालींचाही तपास सुरू आहे. दरम्यान, आरोपीचा कथित दहशतवादी संघटनेशी नेमका संबंध काय होता आणि त्याच्या ऑनलाइन हालचालींचा व्यापक कटाशी काही संबंध आहे का, हे पुढील तपासातून स्पष्ट होईल. सध्या त्याच्यावरील आरोप तपासाच्या अधीन असून, न्यायालयीन प्रक्रियेत ते सिद्ध होणे आवश्यक आहे.

**सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय साधून आवश्यक व्यवस्था वेळेत पूर्ण करावी**

**कुंभमेळा विकास प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह यांचे निर्देश**

## सिंहस्थाच्या ध्वजारोहण सोहळ्यासाठी प्रशासन सज्ज, संपूर्ण कार्यक्रम निर्विघ्न पार पाडण्याचे नियोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक: सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर रामकुंड, नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे होणारे ध्वज- ारोहण सोहळे सुरळीत, सुरक्षित आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडण्यासाठी पास व्यवस्थापन, आसनव्यवस्था, वाहतूक, पार्किंग तसेच प्रवेश आणि निर्गमन मार्गांचे काटेकोर नियोजन करावे. सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय साधून आवश्यक व्यवस्था वेळेत पूर्ण करावी, असे निर्देश कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी दिले.




ध्वजारोहण सोहळ्याच्या व्यवस्थापन समितीच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी प्राधिकरणाच्या समिती सभागृहात आयोजित बैठकीत कुंभमेळा विकास प्राधिकरण आयुक्त बोलत होते. यावेळी महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, अपर जिल्हाधिकारी हेमांगी पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने, प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त कमलाकर रणदिवे, पोलीस उपायुक्त मोनिका राऊत, निवासी उपजिल्हाधिकारी रोहित कुम ार राजपूत, उपजिल्हाधिकारी रवींद्र भारदे, उपजिल्हाधिकारी आप्पासाहेब शिंदे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता नवनाथ सोनवणे, विशेष कार्य अधिकारी संदीप जाधव यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

रामकुंड आणि त्र्यंबकेश्वर येथील ध्वजारोहण सोहळ्यासाठी मान्यवर, लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी, विविध संस्थांचे प्रतिनिधी आणि प्रसारम ाध्यम प्रतिनिधींच्या प्रवेशासाठी पास वितरणाचे नियोजन करण्यात येणार आहे. यासोबतच विभागनिहाय आसनव्यवस्था निश्चित करून प्रवेश नियंत्रणाची प्रभावी यंत्रणा उभारण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. संबंधित विभागांनी उपस्थितीचा आढावा घेऊन आसनव्यवस्थेचा आराखडा तयार करावा आणि त्याची माहिती संबंधित कार्यालयांना उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना आयुक्त शेखर सिंह यांनी दिल्या आहेत. नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये गर्दीचे प्रभावी नियोजन करण्यासाठी येण्या- जाण्याचा रस्ता, बॅरिकेडिंग आणि मान्यवरांच्या हालचालींचे नियोजन करण्यावर भर देण्यात येणार आहे.

मुख्य मंचासमोरील जागा मोकळी ठेवणे, उपलब्ध जागेनुसार विविध श्रेणींतील निमंत्रितांची बैठक व्यवस्था निश्चित करण्याबाबतही चर्चा करण्यात आली. ध्वजारोहण सोहळ्याच्या ठिकाणी वाहतूक कोंडी होऊ नये आणि उपस्थितांना कार्यक्रमस्थळी पोहोचणे सोयीस्कर व्हावे, यासाठी वाहतूक आणि पार्किंगचे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. प्रमुख शासकीय कार्यालयांमधून सामूहिक बस सेवेचा पर्याय विचारात घेऊन जिल्हा परिषद, महानगरपालिका आणि अन्य कार्यालयांशी समन्वय साधावा. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वाहतुकीचे नियोजन करताना वाहन तळ, बसमधून उतरण्याची ठिकाणे, प्रवेशद्वारे आणि कार्यक्रम स्थळापर्यंतचा मार्ग दर्शविणारा नकाशा तयार करावा, असे बैठकीत सूचित करण्यात आले.

मान्यवर आणि नागरिकांना म ार्गदर्शन करणे सुलभ व्हावे, यासाठी दिशादर्शक फलक, प्रवेशमार्ग आणि पार्किंगची माहिती देणारे नकाशे तसेच मार्गदर्शनपर ॲनिमेटेड व्हिडिओ तयार करण्याबाबतही चर्चा झाली. रामकुंड आणि त्र्यंबकेश्वर येथील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन आसन व्यवस्था, माध्यम विभाग आणि बॅरिकेडिंगचा अंतिम आराखडा निश्चित करण्यावर भर देण्यात आला. रामकुंड येथे सायंकाळी होणार्या गोदाआरतीच्या वेळी भाविक आणि पर्यटकांची संभाव्य गर्दी लक्षात घेऊन स्वतंत्र व्यवस्थापन आराखडा तयार करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. रामकुंडावर येण्या-जाण्याचे मार्ग, बॅरिकेडिंग, गर्दी नियंत्रण आणि आपत्कालीन मार्ग खुले ठेवण्यास प्राधान्य द्यावे. भाविकांची सुरक्षितता अबाधित राखून त्यांना आरतीचे दर्शन सुलभ व्हावे, यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले.

सिंहस्थ कुंभमेळ्यानिमित्त होण- ारा ध्वजारोहण सोहळा नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी सर्व विभागांनी त्यांच्यावर सोपवलेल्या जबाबदार्या वेळेत पूर्ण कराव्यात. शिवाय, प्रवेश, वाहतूक, गर्दी नियंत्रण आणि नागरिकांना मार्गदर्शन या बाबींमध्ये समन्वय राखून आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असेही आयुक्त शेखर सिंह यांनी स्पष्ट केले.

# बौद्ध धम्मातील आश्विन पौर्णिमेचे महत्त्व

भारतीय संस्कृतीत पौर्णिमेला धार्मिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिकदृष्ट्या विशेष महत्त्व आहे. आश्विन महिन्यात येणाऱ्या पौर्णिमेला शरद पौर्णिमा किंवा कोजागरी पौर्णिमा असेही म्हटले जाते. विविध भारतीय परंपरांमध्ये या दिवसाचे महत्त्व वेगवेगळ्या स्वरूपात व्यक्त होते. बौद्ध धम्माच्या संदर्भात आश्विन पौर्णिमेचा विचार करताना केवळ चंद्रदर्शन किंवा पारंपरिक विधी यांपुरते मर्यादित न राहता वर्षावासाची सांगता, भिक्खुसंघातील आत्मपरीक्षण, शीलपालन, दान, मैत्री, करुणा आणि प्रज्ञा या मूल्यांचा विचार करणे आवश्यक आहे. बौद्ध धम्माच्या विविध शाखांमध्ये या दिवसाचे आचरण एकसारखे नसले, तरी वर्षावासाच्या समाप्तीशी संबंधित काळ आणि त्यातून मिळणारा आत्मपरीक्षणाचा संदेश महत्त्वपूर्ण ठरतो. आश्विन पौर्णिमेच्या निमित्ताने बुद्धांच्या शिकवणुकीचा वर्तमान भारतीय समाजाशी संबंध जोडणे, हे या दिवसाचे महत्त्व अधिक व्यापक करणारे ठरते.

तथागत गौतम बुद्धांनी मानवी दुःखाचे स्वरूप समजून घेऊन त्यातून मुक्त होण्याचा मार्ग सांगितला. त्यांच्या शिकवणुकीत अंधश्रद्धा, कर्मकांड किंवा बाह्य प्रदर्शनापेक्षा विवेक, नैतिकता, अनुभव आणि प्रज्ञेला महत्त्व आहे. त्यामुळे कोणत्याही धार्मिक तिथीचे महत्त्व तिच्याशी संबंधित परंपरांबरोबरच त्या निमित्ताने व्यक्ती आणि समाजाने स्वीकारावयाच्या मूल्यांमध्येही सामावलेले असते. आश्विन पौर्णिमेच्या निमित्ताने स्वतःच्या विचारांचे, वर्तनाचे आणि सामाजिक जबाबदाऱ्यांचे परीक्षण करणे, मनातील द्वेष व मत्सर कमी करणे, इतरांविषयी करुणा बाळगणे आणि समतेच्या मूल्यांना आपल्या जीवनात स्थान देणे, हा बौद्ध धम्माच्या मूलभूत शिकवणुकीशी सुसंगत दृष्टिकोन आहे.

बौद्ध भिक्खुसंघाच्या जीवनात वर्षावासाला विशेष महत्त्व आहे. पावसाळ्याच्या काळात प्रवास करताना पूर, चिखल आणि इतर नैसर्गिक अडचणी निर्माण होत असत. तसेच या काळात जमिनीवर वाढणाऱ्या वनस्पती आणि निर्माण होणाऱ्या सूक्ष्मजीवांना अनावश्यक इजा होण्याची शक्यता असे. या पार्श्वभूमीवर भिक्खूंनी पावसाळ्यात ठरावीक काळ एका ठिकाणी राहून साधना करण्याची परंपरा विकसित झाली. वर्षावासाच्या काळात भिक्खू धम्माचा अभ्यास करतात, ध्यानसाधना करतात, विनयाचे पालन करतात आणि उपासक-उपासिकांना धम्माचे मार्गदर्शन करतात. गृहस्थ अनुयायीदेखील भिक्खुसंघाच्या सहवासातून शील, दान, संयम आणि प्रज्ञा यांचे महत्त्व समजून घेतात. त्यामुळे वर्षावास हा केवळ एका ठिकाणी राहण्याचा कालावधी नसून वैयक्तिक साधना, सामूहिक शिस्त आणि समाजाशी असलेले नाते दृढ करण्याची संधी आहे.

वर्षावासाच्या समाप्तीशी संबंधित बौद्ध परंपरेत 'पवारणा' या विधीला महत्त्वाचे स्थान आहे. पवारणा म्हणजे भिक्खूंनी आपल्या सहकारी भिक्खूंना वर्तनातील संभाव्य त्रुटी दाखवून देण्याचे आमंत्रण देणे. या प्रक्रियेमागे कोणाचा अपमान करणे किंवा दोषारोप करणे हा हेतू नसतो. उलट, आपल्या आचरणातील उणिवा समजून घेऊन त्या सुधारण्याची तयारी आणि संघजीवनात पारदर्शकता राखणे हा त्यामागील मुख्य उद्देश असतो. व्यक्तीला स्वतःच्या सर्व चुका नेहमीच जाणवतील असे नाही. त्यामुळे विश्वासाच्या वातावरणात इतरांनी दाखवून दिलेल्या त्रुटी शांतपणे ऐकणे, त्यांचा विचार करणे आणि आवश्यक सुधारणा करणे ही धम्माचरणातील महत्त्वाची प्रक्रिया आहे. पवारणेचा हा संदेश आजच्या वैयक्तिक, कौटुंबिक, शैक्षणिक आणि सार्वजनिक जीवनातही मार्गदर्शक ठरू शकतो.

बौद्ध धम्मात शील, समाधी आणि प्रज्ञा ही साधनेची महत्त्वाची अंगे मानली जातात. शील म्हणजे केवळ काही नियमांचे पालन नव्हे, तर आपल्या वर्तनामुळे इतरांना होणाऱ्या परिणामांची जाणीव ठेवून जबाबदारीने जगणे होय. पंचशीलाच्या शिकवणुकीत प्राणिहिंसा टाळणे, चोरी न करणे, कामविषयक गैरवर्तनापासून दूर राहणे, असत्य भाषण न करणे आणि मादक पदार्थांमुळे विवेक हरपेल असे वर्तन टाळणे यांसारख्या नैतिक तत्त्वांचा समावेश होतो. ही तत्त्वे व्यक्तीच्या जीवनात विश्वास, संयम आणि सुरक्षितता निर्माण करण्यास मदत करतात. आश्विन पौर्णिमेच्या निमित्ताने या तत्त्वांकडे केवळ धार्मिक उपदेश म्हणून न पाहता दैनंदिन जीवनातील आचारसंहिता म्हणून पाहिले पाहिजे.

आजच्या काळात असत्य माहिती पसरविणे, दुसऱ्यांची बदनामी करणे, सामाजिक माध्यमांवर अपमानास्पद भाषा वापरणे, आर्थिक व्यवहारांत फसवणूक करणे आणि वैयक्तिक स्वार्थासाठी इतरांच्या हक्कांकडे दुर्लक्ष करणे अशा समस्या दिसून येतात. अशा परिस्थितीत सम्यक वाणी आणि सम्यक कर्म यांचे महत्त्व अधिक वाढते. एखादी माहिती पुढे पाठविण्यापूर्वी तिची सत्यता तपासणे, मतभेद असले तरी व्यक्तीचा सन्मान राखणे, दुर्बल व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि सार्वजनिक संपत्तीचा प्रामाणिकपणे वापर करणे ही आधुनिक जीवनातील धम्माचरणाची उदाहरणे आहेत. आश्विन पौर्णिमेच्या निमित्ताने प्रत्येकाने स्वतःला प्रश्न विचारावा की, माझ्या वर्तनामुळे इतरांच्या जीवनात विश्वास वाढतो की भीती निर्माण होते? माझ्या शब्दांतून मैत्री निर्माण होते की द्वेष? माझ्या निर्णयांमुळे समाजात न्याय वाढतो की विषमता दृढ होते?

आत्मपरीक्षणाचा अर्थ स्वतःला दोष देत राहणे असा नाही. त्याचा खरा उद्देश स्वतःच्या चुका ओळखून त्यांत सुधारणा करण्याची तयारी निर्माण करणे हा आहे. चूक झाली हे मान्य करणे, तिच्यामागील कारण समजून घेणे आणि ती पुन्हा होऊ नये यासाठी प्रयत्न करणे हा प्रगल्भतेचा मार्ग आहे. स्वतःला नेहमीच योग्य समजणाऱ्या व्यक्तीला शिकण्याची संधी कमी मिळते; परंतु आपल्या विचारांत सुधारणा करण्याची तयारी असणारी व्यक्ती अधिक संवेदनशील आणि विवेकी बनते. पवारणेच्या भावनेतून मिळणारा हा संदेश केवळ भिक्खुसंघापुरता मर्यादित नाही. शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकणे, लोकप्रतिनिधींनी जनतेसमोर उत्तरदायी राहणे, प्रशासकीय यंत्रणेने चुका मान्य करून दुरुस्ती करणे आणि कुटुंबातील सदस्यांनी परस्परांशी मोकळेपणाने संवाद साधणे या सर्व क्षेत्रांत आत्मपरीक्षणाची आवश्यकता आहे.

बौद्ध परंपरेत दानाला महत्त्व आहे; मात्र दानाचा अर्थ केवळ पैसा किंवा वस्तू देणे एवढाच नाही. गरजू व्यक्तीला अन्न, वस्त्र, औषधे किंवा शिक्षणासाठी मदत करणे हे दानाचे प्रत्यक्ष स्वरूप आहे. त्याचबरोबर ज्ञान वाटणे, दुःखी व्यक्तीचे म्हणणे संयमाने ऐकणे, संकटात असलेल्या व्यक्तीला आधार देणे आणि अन्यायग्रस्त व्यक्तीच्या बाजूने उभे राहणे हीदेखील दानशीलतेची रूपे आहेत. दानामागे प्रसिद्धी, प्रतिष्ठा किंवा परतफेडीची अपेक्षा नसावी; त्यामागे करुणा आणि इतरांच्या दुःखाबद्दलची जाणीव असावी. अशा भावनेतून केलेले दान समाजात परस्परविश्वास वाढविते आणि एकाकीपणाचा सामना करणाऱ्या व्यक्तींना आधार देते.

वर्षावासाच्या काळात गृहस्थ उपासक आणि भिक्खुसंघ यांच्यातील परस्परसंबंध दृढ होतात. गृहस्थ अन्नदान आणि आवश्यक वस्तूंच्या माध्यमातून संघाला सहकार्य करतात, तर भिक्खू धम्मोपदेश आणि नैतिक मार्गदर्शनाच्या माध्यमातून समाजाला प्रेरणा देतात. या नात्याचा पाया परस्पर आदर आणि सामाजिक सहकार्य हा आहे. वर्षावासानंतर काही बौद्ध परंपरांमध्ये 'कठिन चीवरदान' या परंपरेला महत्त्व असते. या प्रसंगी भिक्खूंना चीवर किंवा वस्त्र अर्पण केले जाते. पवारणा आणि कठिन चीवरदान या परस्पर संबंधित असल्या, तरी त्या एकच विधी नाहीत. पवारणा ही वर्षावासाच्या समाप्तीशी संबंधित संघातील आत्मपरीक्षणाची प्रक्रिया आहे, तर कठिन चीवरदान ही वर्षावास पूर्ण केलेल्या भिक्खुसंघाला चीवर अर्पण करण्याची स्वतंत्र परंपरा आहे. या परंपरांकडे पाहताना दानाचे सामाजिक आणि नैतिक मूल्य समजून घेणे आवश्यक आहे.

दान हे अन्यायकारक व्यवस्था कायम ठेवण्याचे साधन ठरू नये. गरिबी, भेदभाव आणि वंचितता यांची कारणे दूर करण्यासाठी शिक्षण, रोजगार, आरोग्यसेवा आणि समान संधी उपलब्ध करून देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. करुणा ही केवळ सहानुभूतीची भावना नसून दुःख कमी करण्यासाठी कृती करण्याची प्रेरणा आहे. एखाद्या विद्यार्थ्याला पुस्तके देणे हे दान आहे; परंतु त्याला दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न करणे ही सामाजिक जबाबदारी आहे. एखाद्या गरजू कुटुंबाला अन्न देणे आवश्यक आहे; त्याचबरोबर त्या कुटुंबाला रोजगार आणि सन्मानाने जगण्याच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी काम करणेही गरजेचे आहे. अशा प्रकारे वैयक्तिक दानशीलता आणि सामाजिक न्यायाची जाणीव एकमेकांना पूरक ठरतात.

तथागत बुद्धांनी शिकविलेल्या मैत्रीभावाचा अर्थ सर्व सजीवांविषयी सद्भावना बाळगणे असा आहे. करुणा म्हणजे दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव करून ते कमी करण्याची इच्छा; मुदिता म्हणजे दुसऱ्याच्या आनंदात आनंद मानणे; आणि उपेक्षा म्हणजे जीवनातील चढ-उतारांत विवेक व मानसिक संतुलन राखणे. या चार ब्रह्मविहारांचा स्वीकार केल्यास व्यक्तीचे भावविश्व अधिक व्यापक बनते. मतभेद असले तरी द्वेष न बाळगणे, दुसऱ्याच्या यशामुळे मत्सर न करणे, दुःखी व्यक्तीची थट्टा न करता तिला आधार देणे आणि कठीण परिस्थितीतही समतोल राखणे ही या मूल्यांची व्यवहारातील रूपे आहेत. आश्विन पौर्णिमेच्या निमित्ताने अशा सद्गुणांचा अभ्यास आणि आचरण करण्याचा संकल्प करता येतो.

बौद्ध धम्मातील प्रज्ञा म्हणजे केवळ माहितीचे संकलन नव्हे. गोष्टींचे स्वरूप समजून घेणे, कारणपरिणामांचा विचार करणे, पूर्वग्रह ओळखणे आणि विवेकाच्या आधारे निर्णय घेणे ही प्रज्ञेची लक्षणे आहेत. अंधश्रद्धा, अफवा, जातीय द्वेष आणि व्यक्तिपूजेच्या प्रभावाखाली न जाता सत्याचा शोध घेणे हे प्रज्ञेचे सामाजिक महत्त्व आहे. बुद्धांनी व्यक्तीला स्वतः विचार करण्याची आणि अनुभवाच्या कसोटीवर गोष्टी तपासण्याची प्रेरणा दिली. त्यामुळे धम्माचा स्वीकार म्हणजे प्रश्न विचारणे थांबविणे नव्हे; तर अधिक सखोल प्रश्न विचारून सत्य, न्याय आणि कल्याणाच्या दिशेने वाटचाल करणे होय.

भारतीय समाजाच्या संदर्भात समतेचा विचार विशेष महत्त्वाचा आहे. जात, लिंग, भाषा, धर्म, आर्थिक स्थिती किंवा जन्माच्या आधारावर माणसाचे मूल्य ठरविणारी मानसिकता मानवी प्रतिष्ठेला बाधा आणते. बौद्ध धम्मातील करुणा आणि समतेची मूल्ये प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार असल्याची जाणीव दृढ करतात. समाजातील वंचित घटकांना शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि निर्णयप्रक्रियेत समान संधी मिळणे ही सामाजिक न्यायाची मूलभूत गरज आहे. धम्माचरणाचा अर्थ केवळ वैयक्तिक शांतता मिळविणे नसून इतरांच्या दुःखाकडे संवेदनशीलतेने पाहणे आणि अन्याय कमी करण्यासाठी प्रयत्नशील राहणे असाही आहे.

भारतात बौद्ध धम्माची परंपरा प्राचीन काळापासून विकसित झाली आहे. तथागत बुद्धांच्या शिकवणुकीने नैतिकता, अहिंसा, करुणा आणि विवेक यांना महत्त्व दिले. पुढील काळात अनेक भिक्खू, अभ्यासक आणि समाजसुधारकांनी या परंपरेचे जतन व प्रसार केला. आधुनिक भारतात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माचा स्वीकार करून त्यातील समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठेच्या मूल्यांना सामाजिक परिवर्तनाशी जोडले. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरच्या दीक्षाभूमीवर त्यांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि मोठ्या संख्येने अनुयायांनी त्यांच्यासोबत धम्माचा स्वीकार केला. हा ऐतिहासिक प्रसंग भारतीय समाजातील जातीय विषमता आणि अपमानकारक सामाजिक व्यवस्थेविरुद्धच्या संघर्षाच्या संदर्भात महत्त्वाचा ठरतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मदृष्टीत नैतिकता आणि सामाजिक जबाबदारी यांना मध्यवर्ती स्थान होते. माणसाला माणूस म्हणून सन्मान मिळावा, शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, स्त्री-पुरुष समानता दृढ व्हावी आणि समाजातील भेदभाव कमी व्हावा, या उद्दिष्टांशी धम्मातील मूल्यांचा संबंध जोडता येतो. त्यामुळे आश्विन पौर्णिमेच्या निमित्ताने बौद्ध समाजाने केवळ धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यापलीकडे जाऊन वाचनालये, अभ्यासवर्ग, आरोग्यशिबिरे, रक्तदान, विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत आणि वंचित घटकांसाठी मार्गदर्शन यांसारखे उपक्रम राबविण्याचा विचार करावा. अशा उपक्रमांतून करुणा आणि समता ही तत्त्वे प्रत्यक्ष कृतीत उतरू शकतात.

आजच्या वेगवान जीवनात मानसिक ताण, बेरोजगारी, कौटुंबिक संघर्ष, सामाजिक माध्यमांवरील आक्रमकता आणि वाढती असहिष्णुता यांमुळे व्यक्ती व समाजासमोर अनेक आव्हाने उभी आहेत. अशा परिस्थितीत ध्यान, सजगता, संयमित वाणी आणि विवेकपूर्ण निर्णय यांचे महत्त्व वाढते. तथापि, धम्माचा उपयोग केवळ वैयक्तिक ताण कमी करण्यापुरता मर्यादित ठेवणे योग्य नाही. व्यक्तीच्या अंतर्मनातील शांतता आणि समाजातील न्याय यांचा परस्परसंबंध ओळखणे आवश्यक आहे. ध्यान करणारी व्यक्ती जर इतरांच्या दुःखाबद्दल उदासीन राहिली, तर धम्मातील करुणेचा आशय अपूर्ण राहतो. त्याचप्रमाणे सामाजिक परिवर्तनासाठी काम करणाऱ्या व्यक्तीने स्वतःच्या वर्तनात संयम, सत्यनिष्ठा आणि समतेची मूल्ये जोपासणेही गरजेचे आहे.

युवकांसाठी आश्विन पौर्णिमा हा आत्मविकासाचा संकल्प करण्याचा दिवस ठरू शकतो. शिक्षण घेताना चिकित्सक दृष्टिकोन स्वीकारणे, अफवांवर विश्वास न ठेवणे, व्यसनांपासून दूर राहणे, स्त्री-पुरुष समानतेचा आदर करणे, पर्यावरणाचे रक्षण करणे आणि सार्वजनिक प्रश्नांबाबत जबाबदार भूमिका घेणे ही धम्ममूल्यांची आधुनिक रूपे आहेत. सामाजिक माध्यमांवर मतभेद व्यक्त करताना अपमानास्पद भाषा न वापरणे, जातीय किंवा धार्मिक द्वेष पसरविणाऱ्या संदेशांना नकार देणे आणि सत्यापित माहितीच प्रसारित करणे हीदेखील सम्यक वाणीची आचरणातील उदाहरणे आहेत. अशा लहान कृतींमधून समाजात विश्वास आणि बंधुभाव वाढू शकतो.

आश्विन पौर्णिमेचा संदेश अखेरीस चंद्राच्या पूर्णत्वापेक्षा माणसाच्या विचारांतील परिपक्वतेशी अधिक जोडलेला आहे. बाह्य प्रकाशाचे सौंदर्य क्षणिक असू शकते; परंतु विवेक, करुणा आणि समतेचा प्रकाश समाजाच्या दीर्घकालीन परिवर्तनाला दिशा देऊ शकतो. वर्षावासातून मिळणारी शिस्त, पवारणेतील आत्मपरीक्षण, दानातून व्यक्त होणारी उदारता आणि धम्मातील प्रज्ञेचा मार्ग या सर्वांचा स्वीकार दैनंदिन जीवनात झाला, तर पौर्णिमेचे औचित्य अधिक अर्थपूर्ण ठरेल. व्यक्तीने स्वतःच्या चुका ओळखाव्यात, दुसऱ्यांचे म्हणणे ऐकावे, अन्यायाविरुद्ध विवेकपूर्ण भूमिका घ्यावी आणि सर्वांच्या प्रतिष्ठेचा आदर करावा, हा या दिवसाचा व्यापक संदेश आहे.

म्हणूनच आश्विन पौर्णिमा ही धम्माचरणाची नव्याने उजळणी करण्याची संधी म्हणून पाहिली पाहिजे. बुद्धांनी दाखविलेल्या प्रज्ञा, करुणा आणि मैत्रीच्या मार्गावर चालताना स्वतःच्या जीवनात नैतिकता रुजविणे आणि समाजात समतेचे वातावरण निर्माण करणे हेच खरे धम्मकार्य आहे. मनातील द्वेष कमी करून संवाद वाढविणे, भेदभावाऐवजी बंधुता स्वीकारणे आणि केवळ स्वतःच्या कल्याणाचा विचार न करता सर्वांच्या हितासाठी कार्य करणे, यातून आश्विन पौर्णिमेचा संदेश प्रत्यक्षात उतरू शकतो. चंद्राच्या प्रकाशाने उजळलेल्या रात्रीप्रमाणे मानवी जीवनही प्रज्ञेने उजळावे आणि प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगता येईल असा समाज घडावा, हीच या पौर्णिमेनिमित्त अपेक्षा आहे.

**– सुजाता मोरे,** (लेखिका, बौद्ध धम्म व पर्यटन प्रशासनशास्त्राच्या अभ्यासक आहेत) ईमेल – sujata.more2103gmail.com

# 'सजगता आणि काळजी' हीच सायबर गुन्ह्यांपासून बचावाची गुरुकिल्ली





## पत्रकारांच्या कार्यशाळेत सायबर तज्ञांचे मत; शहर पोलिस आयुक्तालय आणि क्राइम पत्रकार संघाचा उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : नागरिकांमध्ये सायबर गुन्ह्यांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी सोलापूर शहर पोलिस दल सातत्याने प्रयत्नशील आहेत. ऑनलाइन फसवणूक, बनावट लिंक, ओटीपीची मागणी, सोशल मीडिया फसवणूक अशा सायबर गुन्ह्यांपासून सावध राहा. आपली वैयक्तिक व आर्थिक माहिती अनोळखी व्यक्तींना देऊ नका. तंत्रज्ञानाचा वापर करताना सजगता आणि सुरक्षितता बाळगणे हीच सायबर गुन्ह्यांपासून बचावाची गुरुकिल्ली असल्याचे सायबर तज्ञांनी सांगितले. यावेळी सोलापूर शहरातील ८० पत्रकार बांधव सहभागी झाले होते.

सोलापूर शहर पोलिस आयुक्तालय व क्राइम पत्रकार संघाच्यावतीने शनिवारी पोलिस आयुक्तालयात पत्रकारांसाठी सायबर गुन्ह्यासंदर्भातील कार्यशाळा पार पडली. यावेळी पोलिस उपायुक्त (गुन्हे) अश्विनी पाटील, पोलिस उपायुक्त (परिमंडल) प्रितम यावलकर, सहाय्यक पोलिस आयुक्त (गुन्हे) दिलीप पवार, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अरविंद माने व क्राइम पत्रकार संघाचे अध्यक्ष विशाल भांगे यांच्यासह आदी पोलिस अधिकारी, कर्मचारी व पत्रकार बांधव उपस्थित होते. या कार्यशाळेचे प्रास्ताविक व स्वागत सायबर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक भालचंद्र ढवळे यानी केले. कार्यशाळेत सहभागी पत्रकारांना सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

'अनोळखी क्रमांकावरून येणारे मेसेज, संशयास्पद लिंक्स किंवा व्हॉट्सपवर येणाऱ्या अनधिकृत गोष्टींवर क्लिक करू नका. एका क्लिकमुळे तुमच्या संपूर्ण मोबाईलचा ताबा सायबर गुन्हेगारांकडे जाऊ शकतो. बँक खात्यांची माहिती, छायाचित्रे आधारकार्डसारखी ओळखपत्रे सायबर गुन्हेगारांच्या हाती लागल्यास त्याचा गैरवापर करून बनावट खाती सुरू केली जातात आर्थिक फसवणूक केली जाते.' त्यांनी पुढे डिजिटल अरेस्ट, बनावट पोलिस अधिकारी बनून धमकावणे, शेअर मार्केटमधील गुंतवणुकीच्या नावाखाली होणारी कोट्यवधी रुपयांची फसवणूक, गॅस बिल भरण्याचे खोटे मेसेज आणि इन्स्टंट लोन प्सच्या माध्यमातून होणारे ब्लॅकमेलिंग याविषयी घडलेल्या प्रत्यक्ष घटनांची उदाहरणे देऊन सायबर तज्ञ अविनाश पाटील व महिला पोलीस अंमलदार प्रांजली काळे यांनी माहिती दिली. या कार्यक्रमास क्राइम पत्रकार संघाचे पदाधिकारी, सदस्य, सोलापूर विद्यापीठ मास कम्युनिकेशन विभागातील विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. आभार इम्रान सगरी यांनी मानले.

कोणत्याही प्रकारची सायबर किंवा आर्थिक फसवणूक झाल्यास नागरिकांनी अजिबात वेळ न दवडता तत्काळ शासनाच्या १९३०, १९४५ या सायबर हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा किंवा थेट सायबर पोलिस ठाण्याशी संपर्क करावा, जेणेकरून खात्यातून गेलेली रक्कम तत्काळ गोठवून (फ्रीझ करून) वाचवता येऊ शकेल, असेही पोलिस उपायुक्त (गुन्हे) अश्विनी पाटील यांनी स्पष्ट केले.

# सिंधुदुर्ग जिल्ह्यात मुसळधार पाऊस; भातशेती पिकाचे मोठे नुकसान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





सिंधुदुर्ग : राज्यात सध्या दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाळा कोरडा गेल्यामुळं बहुतांश भागात शेतकऱ्यांची पिकं करपली आहेत. पिण्याच्या पाण्याचा जनावरांच्या चाऱ्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळं सरकारनं राज्यात दुष्काळ जाहीर केला आहे. अशातच एका बाजूला उन्हाचा तिव्रता वाढत असतानाच दुसऱ्या बाजूला पोऊस कोसळत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. सध्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात मुसळधार पाऊस कोसळत आहे.

दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यानं सिंधुदुर्ग जिल्ह्यात मुसळधार पाऊस कोसळत आहे. वादळी वारा आणि ढगांच्या गडगडाटासह जिल्ह्यातील कुडाळ, सावंतवाडी, दोडामार्ग, वैभववाडी तालुक्यात मुसळधार पाऊस कोसळत आहे. वादळी वाऱ्यासह पाऊस आल्याने उभी भातशेती आडवी झाली आहे. अनेक ठिकाणी कापलेली भातशेती भिजून गेली आहे. या वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने शेतकी पिकांचं नुकसान झाल्यानं शेतकऱ्यांना देखील मोठा फटका बसला आहे. बंगालच्या उपसागरात नव्या हवामान प्रणाली सक्रिय होत असल्याने पुढील दोन आठवड्यांत देशातील अनेक भागांत, विशेषतः दक्षिण द्वीपकल्प आणि पूर्व किनारपट्टीवर मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. महाराष्ट्रातही पुन्हा एकदा पावसाची शक्यता निर्माण झाली आहे. या संभाव्य हवामान बदलामुळे २७ ते २९ ऑक्टोबरदरम्यान महाराष्ट्रातील काही भागांत पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकणासह कोल्हापूर आणि घाटमाथा परिसरात हलका ते मध्यम पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. साताऱ्यातही पावसाचा अंदाज आहे. तर पुणे, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांत कोरडे हवामान राहील, असा हवामान खात्याने सांगितलं आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात पुढील तीन दिवस पावसाचा अलर्ट असून वादळी वारे वाहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता वर्तवली आहे. तर उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागात कोरडे हवामान असणार आहे. पालघर, ठाणे, मुंबई आणि रायगड जिल्ह्यांत हवामान उष्ण आणि दमट राहणार असल्याने लोकांनी घराबाहेर पडताना छत्री आणि पाणी जवळ ठेवावे. तर रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात संध्याकाळच्या वेळी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पावसाची शक्यता आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# डीसीसी बँक निवडणूक : पणन व प्रक्रिया मतदारसंघात अक्कलकोट तालुक्याचे सर्वाधिक २४ मतदार

### तालुकानिहाय संस्थांची आकडेवारी

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पणन व प्रक्रिया मतदारसंघातील उपलब्ध अंतिम मतदार यादीच्या वृत्तानुसार तालुकानिहाय आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | संस्थांची संख्या |
|---|---|---|
| १ | अक्कलकोट | २४ |
| २ | बार्शी | १२ |
| ३ | करमाळा | ५ |
| ४ | माळशिरस | १९ |
| ५ | माढा | १८ |
| ६ | मंगळवेढा | ९ |
| ७ | मोहोळ | ४ |
| ८ | पंढरपूर | ६ |
| ९ | सांगोला | १० |
| १० | उत्तर सोलापूर | ३ |
| ११ | दक्षिण सोलापूर | २ |
| **एकूण** | **११ तालुके** | **११२** |

## सोलापूर डिसीसीचा पणन मतदारसंघ... आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचा शेवटच्या क्षणी मास्टरस्ट्रोक

## आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या अक्कलकोट तालुक्याच्या आकडेवारीकडे लक्ष; जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात निवडणुकीची चर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पणन व प्रक्रिया मतदारसंघातील तालुकानिहाय आकडेवारी महत्त्वाची ठरत आहे. या मतदारसंघात अक्कलकोट तालुक्यातील सर्वाधिक २४ संस्थांचा समावेश असून, त्याखालोखाल माळशिरस तालुक्यातील १९ आणि माढा तालुक्यातील १८ संस्थांचा समावेश आहे. त्यामुळे या मतदारसंघातील तालुकानिहाय संस्थांची संख्या आणि राजकीय समीकरणांकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

अक्कलकोट तालुक्याचे संख्याबळ ठरणार महत्त्वाचे?

पणन व प्रक्रिया मतदारसंघात अक्कलकोट तालुक्यातील २४ संस्थांचा समावेश असल्याने या तालुक्याला संख्यात्मकदृष्ट्या महत्त्वाचे स्थान मिळाले आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी हे अक्कलकोटचे प्रतिनिधित्व करत असल्याने या मतदारसंघातील संस्थांची संख्या आणि निवडणुकीतील प्रत्यक्ष पाठिंबा याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता आहे.

माळशिरस आणि माढा या तालुक्यांतील संस्थांची संख्याही लक्षणीय आहे. बार्शी तालुक्यात १२, सांगोला तालुक्यात १० आणि मंगळवेढा तालुक्यात ९ संस्था आहेत. त्यामुळे या मतदारसंघात विविध तालुक्यांतील संस्थांची भूमिका निवडणुकीच्या दृष्टीने महत्त्वाची ठरू शकते.

**जिल्हा बँकेच्या निवडणुकीकडे लक्ष**

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीमुळे जिल्ह्यातील सहकार आणि राजकीय क्षेत्रात हालचालींना वेग आला आहे. पणन व प्रक्रिया मतदारसंघातील संस्थांचे संख्याबळ, उमेदवारांना मिळणारा पाठिंबा आणि विविध गटांची रणनीती यावर या मतदारसंघातील निवडणुकीचे चित्र अवलंबून राहणार आहे.

अक्कलकोट तालुक्यातील सर्वाधिक संस्थांची संख्या आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या राजकीय प्रभावाच्या दृष्टीने चर्चेचा विषय ठरू शकते. मात्र, संस्थांची संख्या आणि प्रत्यक्ष मतदानातील पाठिंबा या दोन वेगळ्या बाबी असल्याने अंतिम राजकीय चित्र मतदारांचा कल स्पष्ट झाल्यानंतरच समोर येईल.



# सोलापुरात भरधाव मोटारसायकलची धडक; शतपावलीसाठी बाहेर पडलेल्या महिलेचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापुरात भरधाव वेगाने वाहन चालवण्यामुळे आणखी एका दुर्दैवी घटनेत महिलेचा मृत्यू झाला आहे. २१ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी जेवणानंतर शतपावलीसाठी बाहेर पडलेल्या शुभांगी भोज-धरणे यांना भरधाव मोटारसायकलने धडक दिली. या अपघातात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. तसेच भरधाव वाहनचालकांवर कठोर



कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी शुभांगी भोज-धरणे या श्री बंनशंकरी देवी मंदिरासमोरून जेवण केल्यानंतर शतपावली करण्यासाठी बाहेर पडल्या होत्या.त्या रस्त्याच्या बाजूने पायी चालत जात असताना भरधाव वेगाने आलेल्या मोटारसायकलने त्यांना जोरदार धडक दिली. या धडकेत त्या गंभीर जखमी झाल्या. मात्र, या अपघातात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.या घटनेमुळे भोज-धरणे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, परिसरातील नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

दरम्यान या घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी आपला रोष व्यक्त केला आहे. रस्त्यावरून भरधाव वेगाने मोटारसायकल चालवणारे आणि मद्यप्राशन करून वाहन चालवणारे चालक यांच्यावर नियंत्रण कधी येणार? निष्काळजी वाहनचालकांमुळे आणखी किती निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागणार? असे प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत

# पाइप गॅस जोडण्यांना गती; परवाने व शुल्क सवलतींना ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदतवाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात घरगुती पाइप गॅस जोडण्यांचे काम वेगाने पूर्ण व्हावे, यासाठी राज्य सरकारने गॅस कंपन्यांना दिलेल्या विविध सवलतींची मुदत ३१ मार्च २०२७ पर्यंत वाढवली आहे. यामध्ये परवानग्या २४ तासांत देणे, काही शुल्क माफ करणे आणि २४ तास काम करण्याची परवानगी देणे अशा सवलतींचा समावेश आहे.

राज्यातील स्वंयपाकाच्या गॅसच्या सुलभ वितरणासाठी पाइपद्वारे नैसर्गिक वायू वितरणाला गती मिळावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार व केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्यातील सिटी गॅस डिस्ट्रिब्युशन नेटवर्कचा जलद आणि वेगवान विस्तार करण्यात येत आहे. यासाठी राज्य सरकारने ईज ऑफ डुइंग अंतर्गत परवाने देणे सुलभ केले असून काही परवान्यांच्या शुल्क माफीसह अनेक महत्त्वपूर्ण सवलती घोषित केल्या आहेत. गॅस कंपन्याना या सवलती यापूर्वी ३० जून २०२६ पर्यंत देण्यात आल्या होत्या. आता यामध्ये मुदतवाढ देण्यात आली असून आता या सवलती ३१ मार्च २०२७ पर्यंत लागू राहणार आहेत. यासंदर्भातील शासन निर्णय नगर विकास विभागाने जारी केला आहे.

जागतिक भू-राजकीय परिस्थितीमुळे ऊर्जा पुरवठा साखळीवर परिणाम झाल्याने एलपीजी उपलब्धतेवर मर्यादा येत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यात पाइपद्वारे नैसर्गिक वायू जोडण्यांचा विस्तार गतीने करण्यासाठी नगर विकास विभागाने सर्व महापालिका व नगरपालिकांसाठी सूचना निर्गमित केल्या आहेत. शासनाच्या निर्णयानुसार, महानगरपालिका, नगरपरिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग आणि इतर प्राधिकरणांकडे पाइपलाइनसाठी प्रलंबित असलेल्या परवानग्या मंजूर झालेल्या समजण्यात येणार आहेत. तसेच नव्या परवानग्या केवळ २४ तासांत मंजूर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय, गॅस पाईपलाईन पुरवठ्यासाठी खोदण्यात आलेले रस्ते पूर्ववत करण्यासाठी तसेच विविध परवानग्यांसाठी राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्थेकडून आकारण्यात येणारे शुल्क माफ करण्याचाही निर्णय शासनाने घेतला आहे. ज्या ठिकाणी इंधन पुरवठा करणाऱ्या कंपन्या स्वतःच्या खर्चातून सार्वजनिक मालमत्ता पूर्ववत करू शकतील, त्यांना त्यासाठी परवानगी दिली जाणार असून आवश्यक हमीपत्र घेण्यात येणार आहे. तसेच ज्या ठिकाणी कंपन्यांना स्वतःच्या खर्चाने सार्वजनिक मालमत्ता पूर्ववत करुन देणे शक्य नसेल त्या ठिकाणी केंद्र शासनामार्फत दिलेल्या अधिसूचनेमधील विहित शुल्क भरून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. गॅस पुरवठादार कंपन्यांना कामासाठी मोठा दिलासा देताना त्यांना २४ तास काम करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

# सोलापुरात लॉन्ड्री व्यावसायिकांनी वाढविले इस्त्री, धुलाईचे दर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : वीज बिल, पाणीपट्टी, साबण व रासायनिक साहित्याच्या किमतींसह कामगारांचे वेतन आणि दुकानांचे भाडे वाढल्याने सोलापुरातील लॉन्ड्री व्यावसायिकांनी कपड्यांच्या इस्त्री व धुलाईच्या दरात प्रति नग तीन ते दहा रुपयांपर्यंत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. या दरवाढीची अंमलबजावणी तत्काळ सुरू करण्यात आली असल्याची माहिती अखिल परीट धोबी समाज बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे संस्थापक दिनेश काटकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

गेल्या काही दिवसांत लॉन्ड्री व्यवसायासाठी लागणाऱ्या विविध वस्तूंच्या किमतीत सातत्याने वाढ होत आहे. त्याचबरोबर वीज बिल, पाणीपट्टी, कामगारांचे वेतन आणि दुकानांचे भाडे यांचा आर्थिक भारही वाढला आहे. त्यामुळे व्यवसायाचा खर्च लक्षात घेऊन दरवाढ करणे आवश्यक झाले होते. मात्र, ग्राहकांवर अधिक आर्थिक भार पडू नये, याची काळजी घेत मर्यादित स्वरूपात दरवाढ केल्याचे काटकर यांनी सांगितले. नवीन दरानुसार, साध्या कपड्यांच्या इस्त्रीसाठी पूर्वीचे १२ रुपये आता १५ रुपये मोजावे लागतील. स्टार्चसह इस्त्रीच्या दरातही वाढ करण्यात आली आहे. शर्ट आणि पँट या दोन कपड्यांच्या इस्त्रीसाठी किमान ३० रुपये आकारले जातील. कपड्यांच्या धुलाईचा दर प्रति नग ६० रुपयांवरून ७० रुपये करण्यात आला आहे. तसेच साडीच्या इस्त्रीच्या दरात दहा रुपयांनी वाढ करण्यात आली आहे.

# खामसवाडीच्या मुलींचा तालुकास्तरीय कबड्डीत डंका; सलग दुसऱ्या वर्षी विजेतेपद, जिल्हास्तरावर निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे/खामसवाडी/प्रतिनिधी : कळंब तालुका क्रीडा विभागाच्या वतीने आयोजित तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेत जिल्हा परिषद प्रशाला खामसवाडीच्या १४ वर्षाखालील मुलींच्या संघाने इतिहासाची पुनरावृत्ती करत सलग दुसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक पटकावून सर्वत्र कौतुकाची थाप मिळवली आहे.



कळंब येथे झालेल्या या स्पर्धेत तालुक्यातील एकूण २२ नामांकित शाळांच्या संघांनी सहभाग नोंदवला होता. अत्यंत चुरशीच्या झालेल्या या स्पर्धेत खामसवाडीच्या मुलींनी पहिल्या फेरीपासूनच आक्रमक खेळाचे प्रदर्शन केले. उपांत्य आणि अंतिम सामन्यातही प्रतिस्पर्धी संघाला एकही संधी न देता एकतर्फी विजय मिळवत त्यांनी विजेतेपदावर आपले नाव कोरले. संघातील खेळाडूंनी जिद्द, चिकाटी, चपळाई आणि सांघिक समन्वयाच्या जोरावर हा विजय खेचून आणला. बचाव आणि चढाई दोन्ही आघाड्यांवर खामसवाडीच्या मुली सरस ठरल्या. या विजयामुळे संघाची थेट जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड झाली असून आता जिल्ह्यातही विजेतपद मिळवण्याचा निर्धार मुलींनी व्यक्त केला आहे. तालुकास्तरावर सलग दुसऱ्यांदा प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल कृषी उत्पन्न बाजार समिती कळंबचे माजी सभापती शिवाजी अप्पा कापसे यांच्या हस्ते विजयी संघाचा आणि मार्गदर्शक क्रीडा शिक्षकांचा कळंब येथे सत्कार करण्यात आला. यावेळी कापसे यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### खामसवाडी येथील शाळेत उत्साहात स्वागत

या उल्लेखनीय यशाबद्दल आज दिनांक २३ ऑक्टोबर रोजी प्रशालेच्या वतीने शाळेत विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. मुख्याध्यापक रामचंद्र पंवार, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कुलदीप घावटे यांच्या हस्ते विजयी मुलींना पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, शिक्षकवृंद, पालक, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी विजयी संघाचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

खामसवाडीसारख्या ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेने क्रीडा क्षेत्रातही आपला दबदबा निर्माण केल्याने सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांसाठी सेवाभक्तीचा अनोखा उपक्रम!**

# सेवा सोशल वेल्फेअर ग्लोबल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष किशोर दादा पवार यांच्या पुढाकारातून उमरगा येथे अन्नछत्र

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : सेवा हीच भक्ती, मानवसेवा हाच धर्म! या उदात्त विचारातून सेवा सोशल वेल्फेअर ग्लोबल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. किशोर दादा पवार आणि संचालिका सौ. पूजा किशोर पवार यांच्या पुढाकारातून उमरगा येथे श्री तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी पायी जाणाऱ्या भाविकांसाठी अन्नछत्राचा सेवाभावी उपक्रम राबविण्यात येत आहे. श्रद्धा, समर्पण आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम असलेला हा उपक्रम भाविकांना आधार देणारा ठरत आहे.



महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक असलेल्या श्री तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातून हजारो भाविक उमरगा मार्गे तुळजापूरला जातात. विशेषतः बिदर, बसवकल्याण आणि आसपासच्या भागांतून अनेक भाविक पायी प्रवास करतात. या भाविकांचा प्रवास सुखकर व्हावा, त्यांना अन्नाचा आधार मिळावा आणि त्यांच्या भक्तिमय प्रवासात सेवा करता यावी, या भावनेतून फाउंडेशनच्या माध्यमातून अन्नदानाचा उपक्रम सुरू आहे.

गावोगावी सेवाकार्य, समाजहितासाठी पुढाकार! सेवा सोशल वेल्फेअर ग्लोबल फाउंडेशन केवळ अन्नदानापुरते मर्यादित नसून, समाजातील गरजू नागरिकांना मदत करणे, महिला व युवकांना प्रोत्साहन देणे आणि विविध समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून प्रत्येक गावात सेवाभाव पोहोचविण्यासाठी प्रयत्नशील आहे. संस्थापक अध्यक्ष किशोर दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली आणि संचालिका सौ. पूजा किशोर पवार यांच्या सहकार्याने सामाजिक बांधिलकी जपत गरजूंच्या मदतीसाठी पुढाकार घेतला जात आहे. समाजातील प्रत्येक घटकाला मदतीचा हात मिळावा आणि सेवाकार्याची साखळी गावोगावी विस्तारावी, हा फाउंडेशनचा मुख्य उद्देश आहे.

ा उपक्रमासाठी प्रेरणास्थान असलेल्या श्री. अनंत अंबानी साहेब यांच्याविषयी आदर व्यक्त करत, मानवता, करुणा आणि समाजसेवेची भावना अधिक दृढ करण्याचा संकल्प फाउंडेशनच्या कार्यातून व्यक्त होत आहे. अन्नदानासारख्या सेवाकार्यातून भक्तीला मानवतेची जोड मिळते आणि गरजूंच्या चेहऱ्यावर समाधान फुलते, हाच या उपक्रमाचा संदेश आहे.

या वेळी माता सावित्रीबाई फुले बहुउद्देशीय सामाजिक संस्था, उमरगाच्या संस्थापिका-अध्यक्षा पंचशीला कांबळे, लोकशाही पत्रकार महासंघाचे मराठवाडा अध्यक्ष बालाजी सर सूर्यवंशी, मराठवाडा कार्याध्यक्ष धीरजजी बेळमकर, धाराशिव जिल्हा युवा अध्यक्ष राहुल थोरात, लोहारा तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर कांबळे, सविताताई माळी यांच्यासह अन्य पत्रकार बांधव व मान्यवर उपस्थित होते.

भाविकांच्या सेवेतून मिळणारे समाधान आणि त्यांच्या आशीर्वादातून मिळणारी प्रेरणा हीच आमची खरी कमाई, या भावनेतून सेवा सोशल वेल्फेअर ग्लोबल फाउंडेशनचा सेवाभावी उपक्रम सुरू आहे. श्रद्धेच्या वाटेवर अन्नदानाचा आधार देत फाउंडेशनने समाजासमोर मानवता आणि सेवाभावाचा आदर्श ठेवला आहे.

सेवा हीच भक्ती, मानवता हाच धर्म!

# भारतीय शिक्षण व्यवस्थेचा प्राचीन वारसा जपणे गरजेचे

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; आंतरराष्ट्रीय प्राचार्य शैक्षणिक परिषदेचा नागपुरात समारोप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : भारतातील प्राचीन शिक्षण व्यवस्था अतिशय महान असून येथे तक्षशिला, नालंदा, विक्रमशिलासारखी विद्यापीठे अस्तित्वात होती. जगाच्या कानकोपऱ्यातून विद्यार्थी येथे ज्ञानार्जनासाठी येत. हे प्राचीन ज्ञान एवढे वैशिष्ट्यपूर्ण होते की तेव्हाही भारत जागतिक व्यापार, जीडीपी व निर्यातीतही वर्चस्व गाजवत होता. वर्तमानात दिशादर्शक ठरणाऱ्या प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्थेचा वारसा जपणे ही येणाऱ्या पिढीची मोठी जबाबदारी व काळाचीही गरज असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ९ व्या आंतरराष्ट्रीय प्राचार्य शैक्षणिक परिषदेच्या समारोपीय समारंभात बोलत होते. मिहान येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट(आयआयएम) येथे आयोजित या कार्यक्रमास शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, माजी खासदार डॉ. नितीश भारद्वाज यांची विशेष उपस्थिती होती. आयआयएम नागपूरचे संचालक डॉ.भीमराया मेत्री, द साऊथ पब्लिक स्कूलच्या प्राचार्य डॉ. मृणालिनी दस्तुरे, सनफ्लॉवर व तायची पब्लिशिंगचे व्यवस्थापकीय संचालक राजेश घई, नवनीत प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष (एज्युकेशनल बुक्स डिव्हिजन) देविश गाला, द साऊथ पब्लिक स्कूलचे संचालक दिवेन दस्तुरे, न्यू सरस्वती हाऊसचे नॅशनल सेल्स हेडचे प्रमुख विरल उपाध्याय, एड्युव्हेटचे प्रमुख नुपूर मराठे आणि ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसचे सहयोगी संचालक रविशंकर रथ आदी यावेळी उपस्थित होते.

प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीची महानता सांगताना श्री. फडणवीस यांनी आचार्य चाणक्य, पाणिनी या विद्वानांचे व त्यांच्या ग्रंथाचे दाखले दिले. ते म्हणाले, पूर्वी शिक्षणाची प्रणाली 'शास्त्र' व 'संवाद' रुपात होती. ज्ञान केवळ सैद्धांतिक नव्हते तर उपयोजित व कौशल्य-आधारित होते. त्यातूनच राष्ट्रीय, सामाजिक व वैयक्तिक विकास साधता येतो. 'एआय'च्या युगात मानवी मूल्ये, नीतिमत्ता व चारित्र्य जपण्याची मोठी जबाबदारी नव्या पिढीवर असून आपल्या शिक्षण प्रणालीचा केंद्रबिंदू असलेल्या विद्यार्थ्यांभोवतीच्या अनेक चर्चा आपण ऐकतो. या परिषदेने 'जनरेशन वॉव' (वर्ल्ड ऑफ वंडरफुल जनरेशन) ही नवी संकल्पना मांडली असून 'झेन झी' किंवा 'जेन अल्फा'पेक्षा ती निराळी आहे. ही पहिली पिढी आहे, जी माहितीच्या स्फोटासोबत जन्माला आली व तंत्रज्ञानाच्या स्फोटासोबत वाढत आहे. 'मिलेनियल्स' अशी पिढी आहे की ज्यांच्या आयुष्याचा नंतरचा भाग विकसित तंत्रज्ञानासोबत जात आहे. 'जनरेशन वॉव'कडे प्रचंड प्रमाणात माहिती व अफाट उगमस्थाने आहे. त्याचे ज्ञानात रूपांतर करण्याची व त्याचा विचारपूर्वक वापर करण्याची दुहेरी जबाबदारी या पिढीवर आहे. ज्ञान हे त्या माहितीवर प्रक्रिया करण्याचे शहाणपण आहे. त्या माहितीला एक नैतिक स्वरूप देणे, योग्य-अयोग्य आेळखणे व संवेदनशीलतेने ते आचरणात आणणे हेच आज खरे आव्हान आहे.

सध्याच्या माहितीच्या स्फोटाच्या काळात वावरणाऱ्या पिढीला उपलब्ध माहितीचे ज्ञानात रूपांतर करण्याचे शहाणपण अंगी बाणवता आले पाहिजे. सध्याच्या काळात शिक्षक - अध्यापकांची भूमिका ही विद्यार्थ्यांना ज्ञान देण्यापेक्षा त्यांच्या विचार प्रक्रियेला योग्य तो आकार देण्याची असली पाहिजे. माहितीचे ज्ञानात रूपांतर करण्यासाठी आवश्यक ती सखोल चर्चा व मंथन या परिषदेच्या माध्यमातून करण्यात येत असल्यामुळे ही परिषद महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

श्री. फडणवीस म्हणाले, अनेक आक्रमणांमुळे आपल्या देशातील विद्यापीठे व व्यवस्था कोलमडली. विल्यम ॲडम यांच्या सर्वेक्षणानुसार बंगाल, बिहार, पंजाब राज्यांमध्ये लक्षावधी शाळा होत्या. मद्रास प्रेसिडेन्सीमध्ये हजारो व्याकरणशाळा होत्या. आपल्यावर राज्य करणाऱ्यांच्या ह्या नोंदी आहेत. यावरून प्राचीन भारतातील शैक्षणिक समृद्धता लक्षात येते. परंतु ही शैक्षणिक पद्धती व प्रणाली दीर्घकाळ टिकू शकली नसली तरी येथील समाज सुधारकांनी घडवून आणलेल्या क्रांतीने येथे शिक्षणाची बीजे पुनःश्च रोवल्या गेली. त्यातून आपण विकास साधत आहोत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाअंतर्गत या क्षेत्रात अनेक नवीन पद्धतींचा अवलंब करण्यात येत आहे. आपण आपले लक्ष आता नव्या पिढीवर केंद्रित केले पाहिजे. तंत्रज्ञानाचा वापर करणे आपल्याच हातात असून आपण या नव्या पिढीची नवी जडणघडण करायला हवी. मातृभाषेची कास आपण सोडता कामा नये कारण विकसित देशांची शिक्षण प्रणाली त्यांच्या मातृभाषेत आहे. नवीन शैक्षणिक धोरणात याचा अंतर्भाव करण्यात आला आहे. तंत्रज्ञानाच्या आहारी जाण्यापेक्षा ते वापरण्याचे कौशल्य आपण आत्मसात केले तर सर्वांगीण विकास साधता येणे शक्य आहे, असा विश्वास श्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

श्री. पंकज भोयर म्हणाले, 'वर्ल्ड ऑफ वंडरफुल जनरेशन' या संकल्पनेवर आंतरराष्ट्रीय शिक्षण परिषदेत शिक्षण क्षेत्रातील आव्हानांवर सखोल चर्चा पार पडल्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश २०२४७ च्या 'विकसित भारत' या लक्ष्याकडे वाटचाल करत असून, महाराष्ट्रात 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा, आणि 'मुख्यमंत्री विज्ञान विद्यार्थी वारी' यांसारखे उपक्रम राबवले जात आहे. या शिक्षण केंद्री उपक्रमातून विद्यार्थ्यांचा विकास होत आहे. शिक्षण केवळ ज्ञान मिळवण्यासाठी नसून समाज परिवर्तनासाठी आहे. मुख्याध्यापक आणि शिक्षक हे विद्यार्थ्यांचे भविष्य घडवण्यासोबतच त्यांच्यातील उपजत कलागुणांना वाव देण्याचे महत्त्वाचे काम करत असून त्यांचे मोलाचे योगदान आहे.

यावेळी श्री फडणवीस यांच्या हस्ते 'पाथेय- द गोल्डन एलिक्सिर' (झरींहशू - ढहश ेश्चवशप एश्रळुळी) या ई-स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. तसेच, शिक्षण आणि संस्कृती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समर्पित व्यक्तींना प्रतिष्ठित 'नचिकेता' आणि 'सुपर नचिकेता' पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. सर्वोत्तम नचिकेता पुरस्कार श्री नितीश भारद्वाज यांना लाईफ टाईम नचिकेता पुरस्कार, श्रीमती रजिया हुसेन व श्रीमती श्रद्धा केळापुरे यांना व अकॅडमिक्स कन्सल्टंटच्या संचालिका व प्रमुख डॉ. इंदिरा नयना, सेंटर पॉईंट शाळेच्या प्राचार्या श्रीमती कंचन उके यांना सुपर नचिकेता पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती दस्तुरे यांनी केले तर आभार मंगेश चिनेवार यांनी मानले. कार्यक्रमाला शिक्षक, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/ पंढरपूर

सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याचे सभासद व मागील गणित हंगामामध्ये गलितास आलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दीपावलीनिमित्त खूप सुंदर कारखाना कार्यस्थळावर आणि पंढरपूर येथे साखर वाटप करण्याची धोरण सहयोगी ओंकार शुगर कार्पोरेशन यांच्याशी चर्चा करून निश्चित करण्यात आले आहे जाहीर केल्याप्रमाणे मागील गणिताच आलेल्या उसात रुपये शंभर चा हप्ता लवकरच शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येणार आहे मागील सीझनमध्ये जिल्ह्यात सर्वाधिक दर दिलेला असून चालू गोळीत हंगामा जिल्ह्यातील इतर कारखान्याच्या बरोबरीने ऊस दर देण्यात येईल. गणित हंगामांची सुरुवातीपासून ते सन २०२३ अखेर ज्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडे कारखान्याची थकीत येणे बाकी आहे अशा थकबाकीदारांच्या थकीत रकमेवर २५% सौरभ व संपूर्ण व्याज माफ करण्यात येणार असून सर्व थकबाकीदारांनी दोन महिन्याच्या आत आपला ऊस गळीत देऊन रोखीने थकीत रखमा भरण्यात यावा व मुतती दिया सवलतीचा लाभ घ्यावा असेच कामगारांनी आज अखेर प्रामाणिकपणे केलेल्या कामाचा परिश्रमाचा विचार करून सरसकट सर्व कामगारांना २०% पगार वाढ करण्याची संचारक मंडळांनी शिफारस केले असल्याचे सांगितले.

सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याची सन २०२५/ २६ या आर्थिक वर्षाची वार्षिक ३५ सर्वसाधारण सभा माझ्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणामध्ये संपन्न झाली. यावेळी वार्षिक सभेचा विषय पत्रिकेतील सर्व विषयास्व आणि वेळीच्या विषयासहित उपस्थितीत सर्व सभासदांनी आवाज मताने मंजूर देण्यात आली. विषयाचे वाचन प्र कार्यकारी संचालक पोपटराव घोगरे यांनी केले.

प्रारंभी माझी व्हाईस चेअरमन मारुती दादा भोसले, विठ्ठल कारखान्याचे माजी संचालक उत्तम काका नाईक नवरे माजी पंचायत समिती सदस्य सुरेश देटे ज्येष्ठ माजी संचालक बाळासाहेब कौलगे प्रताप भेत्रे संचालिका असो उषाताई माने यांच्या शुभहस्ते मान्यवरांच्या उपस्थिती दीप प्रज्वलन करून श्री विठ्ठल व संस्थापक सहकारी शिरोमणी वसंतराव काळे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व कारखान्याची संचालक शंकर महाराज चव्हाण यांनी उपस्थित यांचे स्वागत केले तर नंतर संचालक युवराज दगडे यांनी श्रद्धांजली व ठराव मांडला.

संस्थापक सहकार शिरोमणी वसंतदादा काळे व त्यांची सहकार्यांनी आपल्या परिसरातील शेतकऱ्यांनी कष्टाने पिकवलेल्या उसास किफायती दर आणि परिसरातील बेरोजगार तरुणांना रोजगार मिळावा यासाठी उभारणी केलेले या संस्थेवर आज हजारो कुटुंबीय उदरनिर्वाण करत असून ही संस्था टिकून राहावी यासाठी मागील वार्षिक संवर्धन सभेमध्ये संचालक व सर्व सभासद यांच्यावतीने कारखाना संयुक्त तत्त्वावर चालविण्यात येत आहे मागील काही हंगामातून अनेक अडचणी सामना करत सभासदांचे व कामगारांचे हित डोळ्यासमोर ठेवून आम्ही सर्व संचालक व सर्व सभासद यांच्यावतीने कारखाना सोयी तत्त्वावर चालवण्यात येत आहे यामागील काही हंगामापासून अनेक अडचणी सामना करत सभासदांचे व कामगारांचे ही डोळ्यासमोर ठेवून आम्ही सर्व सहकारी संचालक अति परिश्रम करत आहोत. सुयोग ओंकार शुगर कार्पोरेशनच्या माध्यमातून अहवाल सालात कारखान्याची विविध बँकेकडून घेतलेल्या कर्जाची व्याजासह एकूण ४७२०.१८ लाख परतफेड केलेली असून उर्वरित कर्जही ओटीएस स्कीम अंतर्गत लवकरच भरणा करण्यात येणार आहेत वैयक्तिक फायद्याचा विचार न करता सर्वांचेही डोळ्यासमोर ठेवून सहयोगी तत्त्वावरील चालवण्याचा निर्णय योग्य असून लवकरात लवकर आपला कारखाना कर्जमुक्त करण्याचा प्रयत्न आम्ही सर्व संचालक करीत आहोत चालू गोळीत हंगामामध्ये जास्तीत जास्त गाळात करण्याची उद्दिष्ट असून सर्व ऊस उत्पादक सभासद शेतकरी यांनी आपला ऊस संपूर्ण ऊस कारखान्याला गणिताच देण्याचे आव्हाने यावेळी केले.

यावेळी कारखान्याची व्हाईट चेअरमन मोहन नागटिळक माझी व्हाईस चेअरमन भारत कोळेकर संचालक सर्व गोरख जाधव राजाराम पाटील दिनकर कदम, नागेश फाटे, योगेश ताड, युवराज दगडे ,परमेश्वर लामकाने, जयसिंह देशमुख, संतोष कुमार भोसले सुनील शेट्टी, अमोल माने, अरुण नलवडे, राजाराम जगदाळे, विश्वास उपाशे, भारत आंबोली ज्योतीरामपुरी दिनकर डोंगरी बाळू माने महादेव दीदी शिवाजी मदने माझी संचालक विविध संस्थेचे चेअरमन व्हाईस चेअरमन पदाधिकारी तसेच कारखान्याची जनरल मॅनेजर रवींद्र साळुंखे सर्व अधिकारी कर्मचारी ऊस उत्पादक सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सगळेच उपस्थित त्यांची आभार व व्हाईचर मन मोहन नाक टिळक यांनी मानले तर सूत्रसंचालन गणेश वाघमळे यांनी केले.

# कळंब आगारात आगार प्रमुख विजय घोलप यांचा सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब (प्रतिनिधी) : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या धाराशिव विभागातील कळंब आगाराने ऑगस्ट महिन्यात उत्पन्नाच्या बाबतीत जिल्ह्यातील सर्व आगारांना मागे टाकत प्रथम क्रमांक पटकावला आहे. याबद्दल ज्येष्ठ नागरिक व प्रबुद्ध रंगभूमी संस्थेच्या वतीने आगार प्रमुख विजय घोलप यांचा शाल, बुके व पुष्पहार देऊन ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष महादेव महाराज अडसूळ, प्रबुद्ध रंगभूमी सामाजिक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुभाष घोडके, सेवानिवृत्त उपप्राचार्य डॉ. शंकर कांबळे, माधवसिंग राजपूत, उद्योजक लक्ष्मण घोडके, राजाभाऊ बारगुले यांनी सत्कार केला.

याप्रसंगी बोलताना ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष महादेव महाराज अडसूळ यांनी बोलत असताना आगार प्रमुख विजय घोलप यांनी शिस्तबद्ध पद्धतीने नियोजन करून कळंब बस आगाराला जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवून दिला आहे, उत्पन्नाच्या बाबतीत कळंब बस आगार मराठवाडा विभागात प्रथम येईल अशी अपेक्षा व्यक्त केली व या दैदिप्यमान कामगिरीबद्दल अभिनंदन केले. आगार प्रमुख विजयकुमार घोलप यांनी सत्काराला उत्तर देताना चालक, वाहक आणि यांत्रिकी कर्मचाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे हे यश मिळाल्याचे सांगितले. त्यांनी याविषयी माहिती दिली, ऑगस्टमध्ये १० हजार प्रवासी वाढले व उत्पन्नात १ कोटी १४ लाख रुपयांची वाढ झाली व जिल्ह्यातील तुळजापूर, उमरगा, धाराशिव, भूम, परंडा या बस आगारातून कळंब बस आगाराला उत्पन्नात प्रथम क्रमांक मिळाला.

कळंब आगारातून ऑगस्ट महिन्यात यंदा तब्बल ९ लाख १७ हजार प्रवाशांनी एसटीच्या विश्वासार्ह सेवेचा लाभ घेतला. मागील वर्षी याच कालावधीत ९ लाख ७ हजार प्रवाशांनी प्रवास केला होता. त्यामुळे यंदा प्रवासी संख्येत १० हजारांची वाढ झाली. कळंब आगाराने याच महिन्यात ८ लाख ९५ हजार किलोमीटरचा एसटी प्रवास केला. तो मागील वर्षी ऑगस्टमध्ये ८ लाख २९ हजार किलोमीटर होता.

याचबरोबर आगार प्रमुखांनी नागपूर दीक्षाभूमी धम्म यात्रेसाठी ४ बस सोडल्यामुळे २०८ भीम अनुयायांना दीक्षाभूमीस नतमस्तक होता आले. या बस फेरीतून आगारास सवलतीसह ५ लाख ३१ हजार ५०७ रुपयांचे उत्पन्न मिळाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माधवसिंग राजपूत यांनी तर आभार यांत्रिकी विभागाचे गणेश गोरे यांनी मानले. कार्यक्रमासाठी ई-बस कळंब आगाराचे व्यवस्थापक राहुल कसबे, लेखापाल पटेल, प्रकाश पटेकर, मेजर वाघचौरे यांच्यासह कळंब आगारातील चालक, वाहक, कार्यालयीन कर्मचारी व यांत्रिकी विभागाचे कर्मचारी यांची उपस्थिती होती.

**चारा पीक लागवडीच्या अंदाजपत्रकास शासनाची मान्यता**

**रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांची माहिती**

# चारा लागवडीतून ग्रामीण रोजगाराला चालना; पशुधनासाठी हिरव्या चाऱ्याची उपलब्धता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चाऱ्याची टंचाई भासू नये आणि ग्रामीण भागातील मजुरांच्या हाताला शाश्वत काम मिळावे, यासाठी राज्य शासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. 'विकसित भारत रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण)' (व्हीबी जी राम जी) अंतर्गत वैयक्तिक तसेच ग्रामपंचायत व सार्वजनिक जमिनीवर चारा पिकांच्या लागवडीसाठीच्या सविस्तर अंदाजपत्रकास (आर्थिक मापदंडास) शासनाने मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे राज्यातील दुष्काळसदृश तालुक्यांसह ग्रामीण भागातील पशुपालकांना हिरवा चारा मिळण्यास मोठी मदत होणार असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळेल, अशी माहिती रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी दिली.

वैयक्तिक जमिनीवर ७ हजार ४९० रोपांच्या चारा लागवडीसाठी एकूण १ लाख २१ हजार ८१५ रुपयांचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले आहे. यामध्ये २४५ मनुष्य दिवसांच्या मजुरीसाठी ७७ हजार ६६५ रुपये आणि साहित्य खर्चासाठी ४४ हजार १५० रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ग्रामपंचायत हद्द, गावठाण तसेच विहिरीजवळील अन्य उपलब्ध जागेवर एक एकर चारा लागवडीसाठी एकूण १ लाख ५५ हजार ३ रुपयांचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले असून यामध्ये २९५ मनुष्य-दिवसांच्या मजुरीसाठी ९३ हजार ५१५ रुपये आणि साहित्य खर्चासाठी ६१ हजार ४८८ रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.



दोन्ही अंदाजपत्रकांसाठी प्रतिदिन ३१७ रुपये मजुरी दर गृहीत धरला आहे.

जमीन स्वच्छ करणे, पूर्वमशागत, खत देणे, पेरणी किंवा लागवड, आवश्यकतेनुसार पाणी देणे, आंतरमशागत, निंदणी, कापणी आणि माहिती फलक आदी कामांचा या अंदाजपत्रकात समावेश आहे. त्यामुळे उपलब्ध जमिनीचा योग्य वापर होऊन चारा उत्पादनात वाढ होईल आणि पशुधनासाठी सातत्याने हिरवा चारा उपलब्ध होण्यास मदत होईल, असा विश्वास मंत्री गोगावले यांनी व्यक्त केला आहे.

खरीप हंगाम २०२६ मध्ये 'ट्रिगर-१' लागू झालेल्या २६५ तालुक्यांतील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता वाढविणे आवश्यक होते. या निर्णयामुळे संभाव्य चारा टंचाईवर प्रभावी उपाययोजना करण्यासह ग्रामीण भागातील पशुपालकांना दिलासा मिळून चारा टंचाईची तीव्रता कमी करण्यास मदत होणार आहे.

राज्यातील बळीराजा आणि पशुपालक संकटात असताना शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. चारा लागवडीच्या या शास्त्रीय आराखड्यामुळे एकाच वेळी दुष्काळ निवारण, हिरव्या चाऱ्याची उपलब्धता आणि ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती असे तिहेरी उद्दिष्ट साध्य होईल. संबंधित सर्व यंत्रणांनी या योजनेची अंमलबजावणी युद्धपातळीवर करावी, असे आवाहन मंत्री गोगावले यांनी केले आहे.